# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.02.2025** **वारःबुधवार**

---

- महाशिवरात्रीनिमित्त आज पहाटेपासून देशभरात भाविकांचा उत्साह, शिवमंदिरांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन
- प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्याची आज सांगता, विशेष रेल्वेगाड्यांची सोय
- दिल्लीच्या मद्य धोरणामुळे महसूल तोटा झाल्याचा कॅग अहवालात ठपका, २१ आमदारांचे बेशिस्त वर्तणुकीमुळे निलंबन

आणि

- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत ऑस्ट्रेलिया - दक्षिण आफ्रिका सामना पावसामुळे बरोबरीत, आज इंग्लंड- अफगाणिस्तानदरम्यान लढत.

**<u>महाशिवरात्री</u>**

आज महाशिवरात्री. त्यानिमित्त देशभरात विविध शिवमंदिरांमध्ये भाविकांची गर्दी होताना पहायला मिळते आहे. उत्तरप्रदेशात वाराणसीत काशी विश्वनाथ धाममध्ये पहाटे जलाभिषेकासाठी जगभरातून भाविकांनी गर्दी केली होती. पहाटे सव्वा दोन वाजता भगवान शंकराची मंगलआरती करण्यात आली त्यानंतर साडेतीन वाजता मंदिर खुलं करण्यात आलं. महामंडलेश्वर कैलासानंद गिरी यांच्या नेतृत्वाखाली नागा साधूही दर्शनाला येत आहेत. प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्याचा आजचा शेवटचा दिवस असल्यानं दिवसभरात १२ ते १५ लाख भाविक काशीला पोहोचण्याची अपेक्षा असल्याचं आमच्या स्थानिक वार्ताहरानं कळवलं आहे. भाविकांना सुरळीत दर्शनासाठी मंदीर प्रशासनाने सूचना जारी केली आहे, कडक सुरक्षा व्यवस्थाही तैनात करण्यात आली आहे. वाराणसीमध्ये येणाऱ्या भाविकांच्या मोठ्या संख्येमुळे, शिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी पारंपारिक शिव बारात काढण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचं आमचा वार्ताहर कळवतो.

गुजरातमध्येही सोमनाथ मंदिर, द्वारकेतील नागेश्वर मंदीर तसंच इत प्रमुख शिवमंदिरांमध्ये भाविकांची गर्दी होते आहे. सोमनाथमध्ये महाशिवरात्रीला विशेष महत्त्व असल्याने पुढील ४२ तास मंदिर दर्शनासाठी मंदीर खुले राहाणार असल्याची माहिती मंदीर व्यवस्थापनाने दिली आहे. महाराष्ट्रातही ठिकठिकाणच्या शिव मंदिरांमध्ये भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली आहे. भीमाशंकर, घृष्णेश्वर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ आणि त्र्यंबकेश्वर या राज्यातल्या ज्योतिर्लिंगांच्या मंदिरांमध्ये दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांच्या रांगा आहेत. विदर्भाची काशी अशी ओळख असलेल्या गडचिरोली इथल्या चामोर्शी तालुक्यातील

मार्कंडेश्वराच्या मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त यात्रा भरवण्यात आली आहे. सिंधुदुर्गात कुणकेश्वराच्या उत्सवालाही पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते झालेल्या पुजेनंतर सुरुवात झाली. पुण्यातही ओंकारेश्वर, पांचाळेश्वर, नर्मदेश्वर, सोमेश्वर इत्यादी मंदिरांमध्ये पहाटेपासून प्रसन्न वातावरणात आणि भाविकांच्या गर्दीत पूजा, अभिषेक आणि मंत्रपठण सुरू आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं  काल रात्री तमिळनाडूतील कोईम्बतूर इथं आगमन झालं. कोईम्बतूरजवळील ईशा केंद्रात शिवरात्रीच्या उत्सवातही ते सहभागी होणार आहेत.

**<u>महाकुंभ</u>**

प्रयागराज इथं गेले सहा आठवडे सुरू असलेल्या सौहार्दाच्या महाकुंभ मेळ्याचा आज समारोपाचा दिवस आहे. तेरा जानेवारीला सुरू झालेल्या महाकुंभमेळ्या देशविदेशातून लाखो भाविकांनी पवित्र स्नानाचा अनुभव घेतला. आतापर्यंत ६४ कोटी ६० लाखांहून अधिक भाविकांनी संगमावर स्नान केलं आहे. जगातला सर्वात मानवतावादी मेळा म्हणून याची ओळख होईल अशा सोहळ्यात काल एका दिवसात एकंदर सव्वा कोटी भाविकांनी त्रिवेणी संगमावर स्नान केले. महाकुंभ २०२५ चा समारोप सुरळीत पार पडावा यासाठी अधिकाऱ्यांनी मेळा परिसर आणि प्रयागराजमध्ये "नो व्हेईकल झोन" लागू केला आहे, तसेच गर्दी नियंत्रणाचे कडक उपाय आणि वाहातुकीचीही व्यवस्था केली आहे.

**<u>रेल्वेगाड्या</u>**

दरम्यान, महाशिवरात्री निमित्त महाकुंभला जाणाऱ्या भाविकांसाठी प्रयागराजहून साडेतीनशे पेक्षा अधिक रेल्वेगाड्या चालवल्या जाणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. महाशिवरात्रीच्या स्नानानंतर अतिरिक्त गाड्या सोडण्याची व्यवस्था केल्याचं रेल्वे मंत्रालयानं सांगितलं आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सतीश कुमार संपूर्ण रेल्वे ऑपरेशनवर बारकाईने लक्ष ठेवत आहेत. दरम्यान, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल महाशिवरात्रीच्या आधी नवी दिल्ली रेल्वे स्थानकाची पाहणी केली.

**<u>बिटकॉईनधाडी</u>**

क्रिप्टोकरन्सी घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने देशभरातल्या ६०हून अधिक ठिकाणी छापे टाकले आहेत. यात पुणे, कोल्हापूर, नांदेड, दिल्ली, चंदिगड, बेंगळुरू शहरांचा समावेश आहे. गेन बिटकॉईन नावाच्या २०१५मध्ये सुरू झालेल्या कंपनीने १८ महिन्यांसाठी दरमहा १० टक्के दराने फायदेशीर परतावा देण्याचं आश्वासन दिलं होतं. २०१७मध्ये या कंपनीचा घोटाळा उघड झाला होता.

**<u>दिल्लीकॅग</u>**

आम आदमी पक्षाने दिल्लीत 2021 साली लागू केलेल्या मद्य धोरणामुळे राज्याला दोन हजार कोटी रुपयांपेक्षा अधिकचा महसूल तोटा झाल्याचं देशाच्या नियंत्रक आणि महालेखा परीक्षक अहवालात म्हटलं आहे. आता हे धोरण रद्द करण्यात आलं आहे. दिल्ली विधानसभा अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी काल मुख्यमंत्री  रेखा गुप्ता यांनी सभागृहात मांडला. या दरम्यान बेशिस्त वर्तणुकीमुळे आपच्या 21 आमदारांना

तीन बैठकांसाठी निलंबित करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. तत्कालीन मद्य धोरणात अनेक त्रुटी आढळून आल्या असून परवाने देताना नियमांचे उल्लंघन झाल्याचं अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**<u>पंतप्रधानआसाम</u>**

जागतिक अनिश्चिततेच्या काळातही जगभरातल्या तज्ज्ञांना भारताच्या वेगवान विकासाबद्दल खात्री असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल गुवाहाटीमध्ये केलं. ॲडव्हाटेज आसाम परिषदेच्या दुसऱ्या आवृत्तीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. गुंतवणूक आणि पायाभूत संरचना ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे. भारतातल्या तरूण लोकसंख्येमुळेच भारताच्या विकासावर सर्वांचा विश्वास आहे, ही तरूण लोकसंख्या वेगाने कौशल्य प्राप्त करत आहे तसेच नवोन्मेषाचे नेतृत्वही करत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. सरकार ईशान्य भारतामध्ये संपर्कजाळे, पायाभूत संरचना तसेच स्थानिक पुरवठा साखळी यांमध्ये सुधारणा घडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

**<u>अमितशहागुंतवणूकादर</u>**

मध्य प्रदेश सरकार, वारसा संवर्धनासह विकास या पंतप्रधानांनी दिलेल्या मंत्राची अंमलबजावणी करून राज्याच्या प्रगतीच्या मार्गावर नेत असल्याचं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. भोपाळ इथं झालेल्या आठव्या जागतिक गुंतवणूक परिषदेच्या समारोपप्रसंगी शहा बोलत होते. या परिषदेदरम्यान ३० लाख ७७ हजार कोटी रुपयांचे गुंतवणूक प्रस्ताव प्राप्त झाले तर सामंजस्य करारांवरही स्वाक्षरी करण्यात आली आहे. भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी ही शिखर परिषद मदत करु शकेल असेही शहा यावेळी म्हणाले. या परिषदेत ६० हून अधिक देशांतले १०० हून अधिक उद्योगपती तर ३००हून अधिक कंपन्यांचे सीईओ देखील सहभागी झाले होते.

**<u>बियाणेशहा</u>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी काल पारंपरीक बियाणांविषयी आयोजित भारतीय बीज सहकारी समितीच्या आढावा बैठकीला उपस्थित होते. समिती पारंपरिक बियाणांच्या संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी प्रयत्नशील असल्याचं शहा यावेळी म्हणाले. खरीप २०२५ पासून देशातल्या विविध प्रदेशांतल्या निवडक पारंपरिक बियाण्यांचे सेंद्रीय उत्पादन आणि बाजारात त्याची व्यापक उपलब्धता सुनिश्चित कऱण्याचे निर्देशही यावेळी दिले.

**<u>ईपीएफओ</u>**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेमध्ये गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये १६ लाखांहून अधिक सदस्यांची नोंदणी झाली. नोव्हेंबर २०२४मध्ये नोंदणी झालेल्या सदस्यांच्या तुलनेत ९ पूर्णांक ६९ टक्के आहे. कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या माहितीनुसार १८ ते २५ वयोगटातील चार लाख ८५ हजार नवीन सदस्यांनी यामध्ये नोंदणी केली आहे.

**<u>किसानक्रेडीट</u>**

किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत आतापर्यंत दहा लाख कोटी रुपयांहून अधिक कर्ज वितरीत करण्यात आली असून त्याचा फायदा सात कोटी ७२ लाख शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. अशी माहिती केंद्रीय अर्थ मंत्रालयानं दिली आहे. किसान क्रेडिट कार्ड खात्यांअंतर्गत २०१४मध्ये असलेल्या ४.२६ लाख कोटी रुपयांवरून वाढून ती डिसेंबर २०२४ मध्ये दुप्पट म्हणजे 10 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे.

**<u>नामांकन</u>**

कर्नाटकातील लेखिका, कार्यकर्ता आणि वकील बानो मुश्ताक यांच्या दीपा भास्थी यांनी कन्नडमधून इंग्रजीत अनुवादित केलेल्या 'हार्ट लॅम्प' हा लघुकथा संग्रहाचा आज लंडनमधील आंतरराष्ट्रीय बुकर पुरस्कार २०२५ साठी संभाव्य पुस्तकांच्या यादीत समाविष्ट करण्यात आला आहे. यासाठी निवडलेल्या 13 जागतिक दर्जाच्या पुस्तकांमध्ये मुश्ताकच्या कार्यानं आणि त्यातील कौटुंबिक आणि सामुदायिक तणावाचं वर्णन करणाऱ्या विनोदी, ज्वलंत, जिवंत आणि उत्साहवर्धक शैलीनं परीक्षकांना आकर्षित केलं आहे. प्रतिष्ठित साहित्य पुरस्काराच्या यादीत कन्नड पुस्तकानं स्थान मिळवण्याची ही पहिलीच वेळ आहे.

**<u>हॉकी</u>**

एफ आय एच हॉकी लीग स्पर्धेत भारतीय पुरुष हॉकी संघानं काल कर्णधार हरमनप्रीत सिंगच्या दोन गोलच्या जोरावर इंग्लंडवर 2-1 असा विजय मिळवला. हरमनप्रीतनं धडाडीनं नेतृत्व करत दोन वेळा गोल करून भारताला हा महत्त्वपूर्ण विजय मिळवून दिला. त्यामुळे भारतीय संघ आता क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. कालच इंग्लंडनं आपल्या प्रतिस्पर्ध्यावर 3-2 असा रोमहर्षक विजय मिळवून स्पर्धेत प्रवेश केला होता, मात्र या सामन्यात त्यांना यश मिळू शकलं नाही.

**<u>क्रिकेट</u>**

आयसीसी पुरुष चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेमध्ये आज दुपारी ब गटातील महत्त्वाच्या लढतीत इंग्लंडचा सामना अफगाणिस्तानशी होणार आहे. पाकिस्तानमधील लाहोर इथल्या गडाफी स्टेडियमवर हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी अडीच वाजता सुरु होणार आहे. आजच्या सामन्यात पराभूत होणाऱ्या संघाला स्पर्धेतून बाहेर पडावं लागणार आहे. त्यामुळे दोन्ही संघांसाठी ही त्यांच्या अस्तित्वाची लढत आहे. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील काल होणारा सामना सततच्या पावसामुळे रद्द करण्यात आला. दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला, ज्यामुळे त्यांचे एकूण गुण तीन झाले. उत्तम धावगतीमुळे दक्षिण आफ्रिका गुणतालिकेत आघाडीवर आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**